## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०३/०८/२०१६.

**१) केबल वायरची चोरी . :–**

दिनांक ०२/०७/२०१६ रोजी २१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी प्रदीप भैयालाल रहांगडाले वय २५ वर्ष, रा. डोगरला ह. मु. चांदणी चौक भंडारा हा रिलायंस कंपनीत मेन्टनंस चे काम करतो दि. १४/०७/२०१६ ला फिर्यादीस पुणे येथील कंपनीमधुन साईड क्रमांक एमओव्हीआय. ०००01 रिलायंस टॉवर डाउन झाल्याबाबत कॉल आला असता फिर्यादी तिथे जावुन पाहीले असता साईडवरील टॉवरचे केबल क्र. ८५०,१८००,२३००,प्रत्येकी ४० फुट लांब प्रत्येकी ०३ केबल असे एकुण ०९ केबल कि. अंदाजे ३२,०००/–रु. चे कोणीतरी अज्ञात इसमाने सातोना येथुन चोरुन नेल्याने व फिर्यादी उशीरा येवुन पो. स्टे वरठी ला फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पो.स्टे. वरठी हे करीत आहे.

**२) घरातील सोना–चांदीच्या सामानाची चोरी. :–**

अ) दिनांक ०२/०८/०१६ रोजी १५.०० ते १५.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी कुमारी आशिका सहादेव हारगुडे वय १८ वर्ष, रा. मोरगाव हिच्या घराचे समोरील दाराचा कुलुप कोणीतरी अज्ञात आरोपीने तोडुन आत प्रवेश करुन लाखडी, आलमारीतील पर्स मध्ये लालकपडयात बांधुन ठेवलेली १ एकदाणी सोन्याचे मणी असलेली, खिचडी पोत ज्यात सोन्याचे लहान मणी १२०, मोठे मणी ०४ व डोरला, चांदीच्या पायपट्टया ०४ असा एकुण २५,०००/–रु. माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४३४,३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

ब) दिनांक ०२/०८/०१६ रोजी १६.३० वा. दर यातील फिर्यादी नेत्राक्ष जिवन नागपुरे वय ३५ वर्ष, रा. रामपुर याच्या घरी कोणी हजर नसतांनी यातील आरोपीने फिर्यादीचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील आलमारी तोडुन त्यात ठेवलेले सोन्याचा मंगळसुत्र वजन ८ ग्रॅम, सोन्याची नथ वजन ३ ग्रॅम, सोन्याच्या दोन बि–या वजन २ ग्रॅम, सोन्याची पानचाली वजन ३ ग्रॅम, २ चांदीच्या पायपट्टया वजन ५० ग्रॅम असा एकुण २४,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन मारहान व शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०८/०१६ रोजी ११.०० वा. दर यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी याला तु कबाडी दुकान दारांना काहीतरी सांगीतले यावरुन ते आमचे कडुन सामान विकत घेत नाही. यावरुन भांडण करुन फिर्यादी याला आरोपी क्र. १ ने डोक्याचे मागे दगडाने मारुन दुखापत केली व आरोपी क्र. २ यांनी लाथाबुक्यानी मारपीट व शिविगाळ करुन त्याचा दात पाडुन दुखापत केल्याने फिर्यादी निलेश धनराज दुनवाणी वय ४० वर्ष, यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

४) एटीएम मशीन मधुन पैश्याची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ०१+०२/०८/०१६ रोजी रात्र. दर यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने इंडीयन ओव्हरसीस बॅक चे बेला येथील एटीएम केंद्राचे शटरचे कोंडे गॅस कटर ने कापुन एटीएम केंद्रात प्रवेश करुन एटीएम मशिन गॅस कटरने कापुन एटीएम मशीन मधील रोख रकमेची चोरी करण्याचा प्रयत्न केला व एटीएम मशीन चे अंदाजे १,००,०००/—रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी नानेश्वर भागवत नवले वय २८ वर्ष, रा. भंडारा यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,५५१,४२७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

५) पैश्याच्या वादावरुन मारहान केली . :—

दिनांक ०२/०८/०१६ रोजी २१.०० वा. दर यातील आरोपीने फिर्यादी सोबत वाहन खरेदी विक्रीबाबत असलेल्या पैशाच्या वादावरुन फिर्यादीस शिविगाळ करुन फॅट या हत्याराने मारहान केल्याने ओठावर, नाकावर, गालावर जखमी केल्याने फिर्यादी समीर अहमद बशीर अहमद शेख वय ४० वर्ष, रा. महीन्द्र नगर गल्ली नं. २ टेकानाका नागपुर यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) टाटा सुमो चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवुन पलटी झाल्याने लोकांना जखमी करण्यास कारणीभुत झाला . :—

दिनांक ०२/०८/०१६ रोजी ०९.४५ वा. दर यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहनात यातील फिर्यादी तसेच इतर १३ ते १४ लोकांना दाटी ने बसवुन तसेच त्याचे ताब्यातील टाटा सुमो वाहन क्र. एमएच ३० एल ६७४१ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन त्याचे गाडी वरील नियंत्रण सुटुन गाडी रस्त्यावर पलटी झाल्याने फिर्यादी व इतर प्रवासी यांना निलज भुयार रोड येथे जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चंद्रशेखर ग्यानीराम लांजेवार वय ३४ वर्ष, रा. मचारना यांचे तोडीं रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम १८४,६६/१९२ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत

७) धान बियाणे बाजारात विक्री करुन शेतक—याची फसवणुक . :—

जानेवारी २०१६ ते मे २०१६ पर्यन्त यातील आरोपीतांनी संगनमत करुन कृषी उत्पन्न बाजार समीती पवनी येथुन धान खरेदी करुन त्याची आरोपी क्र. १ च्या मालकीच्या वर्धा जिल्हयातील यशोधा हायब्रीड शिड प्रा. ला. हिंगनघाट कंपनीच्या नावाच्या लेबलची त्याच कंपनीत पॅकीग करुन तेच धान बियाने बाजारात विक्री करुन भंडारा जिल्हयातील पवनी, लाखांदुर, लाखनी, साकोली, तुमसर, भंडारा, मोहाडी तालुक्यातील अंदाजे ८०० हुन अधिक शेतक—याची अंदाजे १४ लाख रु. ची फसवणुक करुन शासनाची दिशाभुल केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४२०,३४,भादंवि सहकलम ६(अ),७(अ)(ब)बियाने कायदा १९६६ सहकलम १३(१) बियाने नियम १९६८ इतर कलम बियाने नियंत्रण आदेश अधि. १९८३ कलम ८(अ) जिवनाशक वस्तु अधि. १९५५ कलम ३(१),२ (२)(ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

८) <u>अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी.</u> :—

दिनांक ०३/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, तुमसर, व अडयाळ येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २८ लिटर हातभट्टी दारू कि. २६००/रु. तसेच जुगारातुन कि. २३८५/— रु. असा एकुण कि. ४,९८५/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.